शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

(खाजगी वितरण)

अंक २१ वा ऑक्टोबर २०१४

त्रैमासिक क्र. ३

Website : www.bhidekul.in

Email : office@bhidekul.in

वर्ष : 41 अंक : 21 कोल्हापूर ता. 12 ऑक्टोबर 2014 किंमत दोन रुपये Reg. No. GR/RNP/KLP 136/09-11 Posted in Kolhapur RMS

## – संपादकीय –

२०१५ चे भिडे कुलसंमेलन मु.पो.संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे घ्यायचे ठरले आहे. वास्तविक डोंबिवली संमेलनाच्या शेवटच्या सत्रात २०१५ चे संमेलन नाशिक येथे घेण्याचे जवळजवळ नक्की झाले होते. परंतु काही अडचणीस्तव शक्य झाले नाही. म्हणून चिपळूण व ठाणे हे विकल्प पुढे आले होते. परंतु एकाच ठिकाणी, एका वाडीत सर्वात जास्त भिडे असणाऱ्यांचे कोकणातील गाव म्हणजे माभळे (संगमेश्वर) पहिल्याच भेटीत माभळे (संगमेश्वर) येथील भिडे मंडळींनी २०१५ मध्ये संमेलन संगमेश्वर येथे घेण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला त्यादृष्टीने गणेशोत्सवानंतर १३ व १४ सप्टेंबर या दिवशी माभळे येथे चिपळूण, देवरूख, रत्नागिरी, संगमेश्वर इत्यादी कोकणातील भिडे मंडळींबरोबर प्रतिष्ठानची एक बैठक झाली. त्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे ह्या बैठकीला भिडे बंधू/भगिनी व माहेरवाशिणी मिळून ४० ते ५० जण उपस्थित होते. पहिल्याच बैठकीत घरगुती वातावरण असल्यामुळे आपल्या घरातल्या मंगलकार्याचेच जणू काही नियोजन चालले आहे असेच वाटत होते. प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य अशा ८ ते १० जणांची निवास, भोजनासह सर्व सोय केली. माभळे येथील सर्वश्री अनिल, अरुण, प्रभाकर, दिपक ह्या भिडे मंडळींनी नियोजन केले. आपल्याकडे आलेल्या व्यक्तीचे स्वागत व आदरातिथ्य कसे करायचे हे त्यांच्याकडून शिकावे. कोकणातील संमेलनाचे नियोजन ते उत्तमरित्या करतील ह्यात तीळमात्र शंका नाही. म्हणूनच आपण सर्वांनी ह्या संमेलनाला न चुकता आवर्जून उपस्थित रहावे ही विनंती.

२००८ च्या कुलवृत्त प्रकाशना अगोदर माभळयातील भिडेवाडीतून रु. ५१,०००/- देणगीसुद्धा मिळाली होती, हे आपणांस ज्ञात आहेच. प्रत्येक उत्सव, सण, समारंभाचे निमित्ताने ही सर्व मंडळी एकत्र येत असतात. त्यामुळे ही मंडळी हे कार्य लीलया यशस्वी करतील. प्रतिष्ठानचे पदाधिकारी, विश्वस्त, कार्यकारिणी त्यांना मदत करण्यास सदैव कटिबद्ध आहेत. संमेलनाची निमंत्रण पत्रिका पोस्टाने १५ नोव्हेंबर पर्यंत सर्वांना पाठविली जाईल. कदाचित न मिळाल्यास ९६५७५४१२३६ ह्या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा हेच सस्नेह निमंत्रण समजून अवश्य यावे. विद्यार्थी गुणगौरव, जेष्ठांचे सत्कार, प्रतिष्ठानचे दरवर्षीचे पुरस्कार ह्याबद्दलची माहिती 'आम्ही भिडे' अंकात आणि वेबसाईटवर देण्यात येईल. पुन्हा सर्व भिडे कुलबंधु/भगिनी व माहेरवाशिणींना येण्याचा आग्रह करून येथे थांबतो.

## भिडे कुलसंमेलन २०१५

**दि. १७ व १८ जानेवारी २०१५**

**स्थळ : लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय**

हॉटेल स्वाद बिल्डिंग, मुंबई-गोवा हायवे, मु. माभळे,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

वेळ - शनिवार दि. १७ जानेवारी दुपारी ३ ते
रविवार दि. १८ जानेवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत

**संमेलन शुल्क - प्रतिव्यक्ती रु. ४००/-**
**(चहा, नाश्ता, भोजन, निवासासह)**

**- ठळक कार्यक्रम -**

● दि. १७ जानेवारी, शनिवार २०१५

**संमेलन उद्घाटन**
**माभळयातील आषाढी उत्सवाचे पारंपारिक कलादर्शन**
**भोजन आणि भोजनोत्तर कोकणातील नमन (खेळे)**

● दि. १८ जानेवारी, रविवार २०१५

**'आम्ही भिडे' २२ व्या अंकाचे प्रकाशन,**
**विद्यार्थी गुणगौरव, जेष्ठांचे सत्कार, भिडे प्रतिष्ठानचे पुरस्कार वितरण, मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम, भोजनोत्तर पुढील वर्षाचे (२०१६) संमेलन संदर्भात खुली चर्चा, प्रत्यक्ष संवाद**

**सूचना :** संमेलन निमंत्रण पत्रिका नोव्हेंबर २०१४ मध्ये प्रतिष्ठानकडे उपलब्ध असलेल्या पत्त्यावर सर्वांना पोस्टाने पाठविल्या जातील. त्यामध्ये संपर्क, नाव व क्रमांक दिले जातील तसेच अधिक माहिती www.bhidekul.in वेबसाईटवर सुद्धा उपलब्ध आहे.

**ता. क. :** निमंत्रण पत्रिका मिळाली नाही तरीसुद्धा समस्त भिडे कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींना सस्नेह व आग्रहाचे निमंत्रण

## जुलै २०१४ ते सप्टेंबर २०१४ पर्यंतचे देणगीदार

| | | |
|---|---|---|
| १) श्री. विद्याकर वासुदेव भिडे, पुणे | रु. १०००/- | वाढदिवस देणगी |
| २) श्री. श्रीराम श्रीपाद भिडे, चिपळूण | रु. १०००/- | वाढदिवस देणगी |
| ३) श्री. राजेंद्र एस्. भिडे, दादर | रु. १०००/- | वाढदिवस देणगी |
| ४) डॉ. सौ. वसुधा विद्याधर भिडे, पुणे | रु. १०००/- | वाढदिवस देणगी |
| ५) सौ. पूर्वा प्रमोद देवधर, गिरगांव | रु. १०००/- | आजीव सभासद |
| ६) सौ. शैलजा दत्तात्रय भिडे, वसई, | रु. १०००/- | आजीव सभासद |
| ७) सौ. संपदा राजेन्द्र भिडे, दादर | रु. १०००/- | देणगी |
| ८) सौ. प्रज्ञा प्रशांत भिडे, दादर | रु. १५००/- | देणगी |
| ९) सौ. अंजली कुलकर्णी, मालाड | रु. १०००/- | देणगी |
| १०) सौ. सुचित्रा भिडे (शहा)दादर | रु. ११००/- | देणगी |
| ११) हळदीकुंकू समारंभ, मुंबई | रु. १५००/- | देणगी |

'आम्ही भिडे' च्या २०व्या अंकाचे प्रकाशन भिडे कुलवृत्ताचे जेष्ठ संपादक श्री. विनायकराव स. भिडे, डोंबिवली यांच्या हस्ते तळेगांव -दाभाडे येथे झाले.



डावीकडून सर्वश्री श्री. चंद्रकांत भिडे, श्री. मा.चिं. भिडे, श्री. शशिकुमार भिडे, श्री. विनायकराव स. भिडे, श्री. दिलीप भिडे आणि श्री. प्रभाकरपंत भिडे


**आम्ही भिडे अंक २१ वा**

**संपादक** : श्री. शशिकुमार केशव भिडे

**कार्यकारी संपादक** : श्री. चिंतामणी भिडे

**संपादक मंडळ** : ले.क. सुनील भिडे, श्री. दिलीप भिडे, श्री. प्रभाकर शं. भिडे, श्री. बिलास भिडे, सौ. प्रिया भिडे, सौ. संपदा भिडे, श्री. विजय अ. भिडे, सौ. पूर्वा देवधर, सौ. प्रीती प्र. भिडे

**सल्लागार मंडळ** : श्री. सुनील भिडे (अभिरूची), शशिताई घुले, श्री. के. मो. भिडे, श्री. शरदराव ह. भिडे

**अक्षर जुळणी** : रविंद्र पाटणकर


## - प्रतिक्रिया -

भिडे प्रतिष्ठानच्या प्रत्येक कार्यक्रमात अथवा संमेलनामध्ये प्रतिष्ठानसाठी निधीवृद्धी व्हावी ह्याकरिता प्रयत्न व्हावा असे आम्हाला वाटते.

१) संमेलनात होणारा छोटा/मोठा खर्च हा अंदाजपत्रकानुसारच व्हावा. म्हणजेच भोजन, निवास, मनोरंजन कार्यक्रम, सत्कार समारंभ इत्यादी. खर्चाचे अंदाजपत्रक घेऊन, प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांशी सल्लामसलत करूनच ते बसवावे.

२) संमेलनाची वेळ, प्रमुख पाहुणे, पदाधिकाऱ्यांनी व संमेलनाला येणारा अतिथी वर्ग ह्या सर्वांनीच वेळेचे बंधन पाळले पाहिजे.

३) संमेलनाच्या भोजन व्यवस्थेबाबत मागील संमेलनाचा अंदाज आणि संमेलनास उपस्थित राहणाऱ्यांची संख्या ह्याचा अंदाज घेण्यासाठी अनुभवी कार्यकर्त्यांचे/पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

४) प्रत्येक कार्यकर्त्यांने घेतलेल्या कामाची जबाबदारी पूर्ण करावी.

५) कार्यक्रमाची आखणी करतांना सर्वानुमते एकत्र आखणी व्हावी.

६) संमेलनाबाबत असलेल्या सर्व सूचना लेखी असाव्यात.

७) संमेलनास उपस्थित राहणाऱ्या भिडे कुल बंधू/भगिनी व माहेरवाशिणींनी निमंत्रण पत्र मिळाल्यावर आपण संमेलनास हजर राहणार असल्याचे संयोजकास कळवावे म्हणजे त्यादृष्टीने नियोजन करता येईल.

८) संमेलनाकरिता तरुणवर्गाची संख्या अपेक्षेपेक्षा कमी असते म्हणून तरुण वर्गाकरिता कार्यक्रमांचे नियोजन असावे. तसेच संमेलनामध्ये आपल्या घरातील किमान एकतरी तरुण येण्याकरिता प्रयत्न करावा.

९) २६ जुलै २०१४ रोजी मुंबई येथे ह्याठिकाणी सायं. ७ वाजता भिडे कुटुंबियांकरिता एक बैठक घेण्यात आली. उपस्थिती कमी होती तरीसुद्धा प्रतिसाद उत्तम मिळाला त्यानुसार उपस्थित असलेल्यांनी आजीव सभासद/देणगी दिली.

१०) प्रत्येक महिन्यातील शेवटच्या शनिवार किंवा रविवारी एकत्र जमून मुंबईत एक बैठक घेण्याबाबत निश्चिती झाली आहे. ह्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यामध्ये, प्रत्येक गावामध्ये महिन्यातून एक दिवस, एक तास एकत्र भेट झाली तर प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये वृद्धी होऊन सकारात्मक कार्य होईल असा विश्वास वाटतो.

सौ. संपदा भिडे, मुंबई
सौ. पूर्वा देवधर (भिडे) मुंबई

## भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### ऑक्टोबर

१) कु. प्राची संजय भिडे, माणगांव ७
२) कु. प्रिती संजय भिडे, माणगांव ७
३) कु. प्राजक्ता सुरेन्द्र भिडे, ठाणे ७
४) श्री. शरद प्रभाकर भिडे, चिपळूण ९
५) श्री. शेखर केशव भिडे, माभळे १२
६) कु. ऋषभ विक्रम भिडे, हैद्राबाद १५
७) श्री. रोहन सुनील भिडे, पुणे १६
८) श्री. रमेश महादेव भिडे, डोंबिवली १६
९) सौ. माधवी प्रसाद भिडे, ठाणे १७
१०) सौ. अपर्णा शरद भिडे, सांगली १७
११) श्रीमती प्रज्ञा वसंत भिडे, रत्नागिरी १७
१२) सौ. जान्हवी विवेक भिडे, रत्नागिरी १७
१३) सौ. प्रियांका सुरेन्द्र भिडे, ठाणे १९
१४) श्री. अमित रविन्द्र भिडे, कल्याण १९
१५) श्री. अमेय अरविंद भिडे, पुणे २१
१६) श्री. चिंतामण नरहर भिडे, पुणे २१
१७) श्री. हर्षवर्धन श्रीकृष्ण भिडे, पुणे २२
१८) सौ. संध्या बळवंत भिडे, अंमळनेर २२
१९) कु. सुप्रिता प्रसन्न भिडे, मुंबई २४
२०) श्री. प्रकाश शंकर भिडे, डोंबिवली २५
२१) श्री. सचिन बळवंत भिडे, अंमळनेर २५
२२) सौ. नमिता नितीन भिडे, कल्याण २८
२३) सौ. स्मिता श्रीधर भिडे, चिपळूण २९
२४) श्री. मिहीर नितीन भिडे, पुणे ३०
२५) श्री. बाळकृष्ण त्रिंबक भिडे, पुणे ३०

### नोव्हेंबर

१) श्री. विठ्ठल दत्तात्रय भिडे, डोंबिवली १
२) कु. धनंजय मुकुंद भिडे, बेळगांव १
३) डॉ. संतोष शंकर भिडे, पुणे २
४) श्री. धनंजय काशीनाथ भिडे, खालापूर २
५) कु. नृपजा सुनिल भिडे, पुणे २
६) सौ. सुलभा श्रीकृष्ण भिडे, पुणे ३
७) श्री. राजेन्द्र वासुदेव भिडे, डोंबिवली ३
८) श्री. परेश प्रशांत भिडे, पुणे ५
९) सौ. शितल सतिश गांगल, गोरेगांव ७
१०) श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे, पुणे ८
११) सौ. सुवर्णरेखा आदित्य देवधर, पुणे ८
१२) श्री. प्रदीप जगन्नाथ भिडे, मुंबई ९
१३) श्री. संजीव केशव भिडे, पुणे ९
१४) सौ. वृषाली पंकज भिडे, कर्नाटक ९
१५) श्री. संदीप बळवंत भिडे, अंमळनेर ११
१६) अनिल महादेव भिडे, भोपाळ ११
१७) श्री. केदार सुभाष भिडे, मालाड १२
१८) श्री. गिरी शरद भिडे, विलेपार्ले १२
१९) सौ. वीणा सच्चिदानंद वेलणकर, पुणे १२
२०) श्री. सचिन श्रीकांत भिडे, पुणे १४
२१) श्री. श्रीपाद श्रीकांत भिडे, सोलापूर १५
२२) श्री. चंदन चिंतामण भिडे, पुणे १६
२३) कु. राजश्री माधव भिडे, पुणे १८
२४) सौ. शोभा शरद भिडे, पुणे १९
२५) श्री. चंद्रकांत शंकर भिडे, ठाणे १९
२६) श्री. तेजस राजाराम भिडे, अलिबाग २०
२७) श्री. अजित चिंतामणी भिडे, पुणे २०
२८) श्री. अशोक लक्ष्मण भिडे, रत्नागिरी २२
२९) श्री. सतिश केशव भिडे, विलेपार्ले २३
३०) कु. स्वप्नाली प्रसन्न भिडे, मुंबई २३
३१) श्री. केदार प्रभाकर भिडे, पुणे २३
३२) सौ. सुचेता मधुकर भिडे, रायगड २४
३३) श्री. अविनाश मधुकर भिडे, पुणे २५
३४) श्री. योगेश शरद भिडे, पुणे २५
३५) सौ. प्रीती विवेक पाटणकर, पुणे २५
३६) श्री. एस्. ए. कृष्णा भिडे, कर्नाटक २५
३७) सौ. मालीनी शरद भिडे, चिपळूण २९
३८) श्री. सुहास सुभाष भिडे, सोलापूर ३०
३९) श्री. गुरुनाथ श्रीधर भिडे, चिपळूण ३०

### डिसेंबर

१) सौ. लता वसंत भिडे, ठाणे १
२) सौ. ज्योत्स्ना शरद भिडे, पुणे १
३) कु. जय प्रविण भिडे, गोवा २
४) सौ. शिल्पा श्रीकृष्ण भिडे, मालाड २
५) श्री. सुरेन्द्र बळवंत भिडे, ठाणे ३
६) श्री. विरेंद्र विश्वनाथ भिडे, पुणे ४
७) श्री. सिध्देश्वर बाळकृष्ण भिडे, पुणे ४
८) श्री. वामन नरहर भिडे, पुणे ५
९) श्री. अविनाश वासुदेव भिडे, पुणे ५
१०) श्री. सदानंद यशवंत भिडे, कांदीवली ६
११) श्री. रोहित प्रकाश भिडे, डोंबिवली १०
१२) श्री. सुभाष वामन भिडे, मालाड १२
१३) सौ. कविता प्रविण भिडे, पुणे १४
१४) श्री. प्रशांत त्रिंबक भिडे, पुणे १५
१५) श्रीमती चित्रा चं. करंदीकर, रत्नागिरी १८
१६) सौ. रजनी काशीनाथ भिडे, सोलापूर २०
१७) श्री. वामन गणेश भिडे, पुणे २०
१८) सौ. सुरश्री चंदन भिडे, पुणे २१
१९) श्री. श्रीकृष्ण विश्वनाथ भिडे, २२
२०) श्री. तेजस श्रीकृष्ण भिडे, मालाड २२
२१) सौ. गायत्री केदार भिडे, डोंबिवली २३
२२) श्री. दिलीप रघुनाथ भिडे, मुंबई २४
२३) सौ. वंदना अरविंद भिडे, पुणे २४
२४) सौ. सीमा विजय गांगल, गोरेगांव २४
२५) कु. राजस माधव भिडे, पुणे २४
२६) श्री. दिलीप वासुदेव भिडे, पुणे २६
२७) श्री. नितीन दिनकर भिडे, कल्याण २६
२८) श्री. विक्रम विलास भिडे, २६
२९) श्री. गोविंद मुकुंद भिडे, डोंबिवली २७
३०) कु. राजस नितीन भिडे, कल्याण २७
३१) श्री. संदीप शरद भिडे, पुणे २८
३२) श्री. चारुचंद्र चिंतामणी भिडे, पुणे २९
३३) सौ. विजयश्री मिलींद भिडे, पुणे २९

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठीही तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिक दृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**

# रम्य ते बाळपण

सौ. सुधा उपेंद्र भिडे, बडोदा
०२६५-२२८३५८३

मी, कै. वेदमूर्ति वासुदेव लक्ष्मण भिडे, सातारा यांची तृतीय कन्या. अर्थात भिड्यांची माहेरवाशिण. १९५५-५६ सालापर्यंत आम्ही व्यंकटपुऱ्यातील गोडबोले वाड्यात रहात होतो. वाड्यात लहान मुलगी म्हणून माझेच कौतुक होई. गुटगुटीत शरीर, हसरा चेहरा, चुणचुणीत स्वभाव यावर गोडबोले वहिनी बेहद खूष असत. त्या माझे खूप कोड कौतुक करीत असत. त्यांनी मला 'देवबाप्पा, चंदाराणी' हा ब्लॅक ॲण्ड व्हाईट पिक्चर प्रथम दाखविला. तेव्हापासून त्या मला चंदाराणी म्हणत असत. नंतर आम्ही १९५६-५७ सालात २२२ मंगळवार पेठेत राहायला आलो. दोन्ही घरांमध्ये फारसे अंतर नव्हते. घर बदलल्यानंतर सुरवातीला तर सवयीमुळे शाळा सुटल्यावर पाय गोडबोले वाड्याकडे वळत असत. रम्य अल्लड बालपणींच्या गप्पांची गोडी अवीटच ! नवोढा माहेरवाशिण आणि माझ्यासारखी वयोवृद्ध माहेरवाशिण यांच्यात फरक एवढाच की पहिलीला गप्पा मारायची संधी मिळते; दुसरीला आठवणीत रमावे लागते.

'घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसांत
माहेरीच्या सुवासाची कर बरसात' अशी आठवण करत समाधानाची ढेकर द्यावी लागते.

'लहानपण देगा देवा' असे तुकोबारायांनी म्हटले आहे. म्हातारपण हे दुसरे बालपण म्हणतात. बालपणींच्या आठवणींची रम्यता काय असते ते मी अनुभवत आहे. 'वयाची साठी झाली की बुद्धी नाठी होते' असे म्हणणाऱ्यांना एकच सांगणे आहे की बालपणीच्या रम्य आठवणींच्या गाठी जर आत्ता उलगडत बसलो तर ''आयुष्मान भव'' या आशिवार्दाची गरज भासणार नाही. बालपण आणि त्यातील रम्यता अळवावरच्या पाण्यासारखी. बकुळीच्या फुलांप्रमाणे बालपण केव्हा फुलते अन् केव्हा कोमेजते ते कळत नाही, पण त्याच्या रम्यतेचा सुवास कायम टिकतो. तेथे षड्‌रिपूंना मज्जाव असतो. असते ते निखळ प्रेम. माझ्या आठवणींच्या पोतडीतील एक रम्य आठवण सांगणार आहे.

१९५७-५८ चा काळ होता. शाळेमध्ये चंद्रगुप्त मौर्याचा पाठ शिकवला जात होता. इतिहासाचा तास त्या पाठातील एक वाक्य अजूनही आठवते. चंद्रगुप्ताचे गुरू चाणक्य म्हणतात, ''नंदराजाचा नाश करीन मगच शेंडीला गाठ मारीन.'' चाणक्य नीती कळण्याचे ते वयही नव्हते. फक्त कुतुहल होते शेंडीचे. माझे वडील दशग्रंथी ब्राह्मण. भस्मचर्चित कांती, करारी मुद्रा, डोक्यावर काळीभोर शिखा. दादांच्या नजरेत जरब एवढी की समोरच्या व्यक्तीला त्यांच्याबद्दल भीतीयुक्त आदर वाटावा. बालसुलभ अल्लड स्वभावामुळे मला त्यांची कधी भीती वाटली नाही. मला कुतुहल वाटायचे त्यांच्या काळ्याभोर शेंडीचे. अन् शेंडींच्या गाठीचे. त्यांच्या अंगाखांद्यावर खेळतांना मी त्यांच्या शेंडीची गाठ सारखी सोडत असे. त्यांनी रागावून पाहिले, गोड बोलून पाहिले. पण मी काही ऐकायची नाही. यावर एक उत्तम तोडगा दादांनी काढला. अन् एकेदिवशी मला म्हणाले, 'चंदाराणीला एक गंमत दाखवणार आहे पण जर तिने माझ्या शेंडीला हात लावला नाही तर ! मलाही कुतुहल वाटले काय असेल गंमत ? मनाला आवर घालून मीही शेंडीला हात न लावण्याचा निश्चय केला. दोन दिवस झाले, तीन दिवस झाले उत्सुकता ताणली जाऊ लागली. अन् रविवारचा दिवस उजाडला.

दादांनी आईला (वहिनीला) मला व माझ्या मोठ्या बहिणीला तयार करण्यास सांगितले. आईने दुपारचे चहापान झाल्यावर आम्हा दोघींना तयार केले. कानावर वेण्यांची कडबोळी आणि सॅटीनचा फ्रॉक घालून माझी स्वारी तयार झाली. दादांनी थोडेसे अत्तरही लावले. मला व सुमनला घेऊन दादा तळ्यापर्यंत गेले आणि परत आले. दादांना परत आलेले पाहून वहिनींनी विचारले का परतलात ? त्यांनी उत्तर दिले अग पाऊस बघ केवढा भरलाय ? एक छत्री घेण्यासाठी आलो. छत्री घेऊन आम्ही परत निघालो. आम्ही भिजू नये म्हणून ते काळजी घेत होते. स्वतः भिजत होते. मग आम्ही चालत भिजत प्रभात टॉकीजजवळ आलो. तेव्हा 'झनक झनक पायल बाजे' हा रंगीत पिक्चर होता. पिक्चर काही फारसे कळले नाही पण रंगीत पिक्चर पाहण्याचा अट्टाहास आवडला. नंतर कित्येक दिवस पिक्चरचे कौतुक मी सगळ्यांना सांगत राहिले, पण सगळ्यांना नवल वाटत होते ते याचे की नाटक सिनेमा याचे वावडे असणारे दादा सिनेमा पहायला गेले कसे ? आजही ही आठवण मनाला सुखाविते. पितृप्रेमाच्या ह्या बरसातीत मी चिंब भिजून जाते.

**ATTENTION**

**FOR BHIDE'S FIRST**

One Bed Room Flat,
approximately 485 Sq.Ft. area,
used as a second home by
Mumbai based owner d/o Bhide
15 years old
is available for sale
Well Furnished
Located at Kalyani Nagar, Pune.
May Contact on Mobile
**9657984104**
**after 8.30 p.m.**

# रम्य ते बालपण

सौ. नीला नंदकुमार ताम्हनकर, सांगली
९३२६६९१४२१

'लहानपण देगा देवा । मुंगी सारखेचा रवा ॥' असे कोण्या एका कविने म्हटले आहे. ते खरोखरच सत्य आहे. लहानपणी कसली चिंता, काळजी, ताण नसतो. निरागस असते बालपण. माझ्या बालपणी वयाची ५ वर्षे पूर्ण झाली की शाळेत घालत असत. प्रथमतः माझ्या आईने माझे नाव शाळा नं. ११ येथे दाखल केले. त्यावेळी मला सौ. असनीकर बाई होत्या. शाळेची मला खूप आवड होती. आम्ही एकूण आठ भावंडे होतो. मी दोन भावांच्या मधली. आमच्यामध्ये दोन ग्रुप अनायासे पडले होते. मोठ्या तीन बहिणी व नंतर आम्ही पाचजण. घरची परिस्थिती खूपच बेताची होती. वडील भिक्षुकी करायचे. पण आम्हाला साथ दिली ती आमच्या काकांनी. आमचा काका इतका त्यागी इतका चांगला काका पहायला मिळणार नाही. शाळेला सुट्टी लागली की, मी माझ्या आजोळी कण्हेर आकले ता. मेढा येथे जायचो. काकूला (आजीस) मदत करायचो. करंज्या गोळा करायच्या. त्या फोडायच्या, विकायच्या. आंबे, जांभळे, करवंदे गोळा करायची. खूप मजा करायची. माझ्या मामाचा मळा होता. त्यामध्ये तळे होते. त्यात पोहायला जायचो. एकदा मी हट्टून बसले असतांना माझा मामा फोक घेऊन मारायला आला. अर्थातच चेष्टेने. ती आठवण मनात कायम राहिली. तसेच आजीच्या परसदारी विहीर होती. त्या विहीरीस दुष्काळाने पाणी कमी असायचे. तरीही लोक पाणी नेण्यास येत असत. माझ्या मनात तेच घर करून राहिले. मी रात्री झोपेतच बडबडले. 'ओ, विहीरीचे पाणी ओढू नका की, विहीरीत पाणी नाहीये ? सकाळी उठल्यावर सगळीजण मला म्हणाली काय बडबडत होतीस झोपेमध्ये.

एकदा खेळताखेळता मी चार आण्याचे नाणं आणि एकदा माझ्या धाकट्या भावाच्या गळ्यातील सोन्याचा बदाम गिळला होता. तर हे मामा व भावंडे मला चिडवीत, बदाम कोणी खाल्ला ? नाणे कोणी गिळले कळल्यावर माझ्या आईने मला दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी केळी खाण्यास सांगितले. दुसरे दिवशी नाणे पडून जाईल असे सांगितले, तेव्हा आईच्या जिवात जीव आला. पत्ते हा माझा विक पॉईंट होता. दुपारचे जेवण झाल्यावर शेजारच्या चौघीजणी पत्ते खेळायला बोलवत. ३०४ हा आवडीचा खेळ. खूप मजा यायची. सातवीत असतांना पी.ए.सी.च्या परीक्षेत शाळेत पहिली आले होते. घरातली लोक चेष्टा करीत म्हणत, 'बासरांत लंगडी गाय शहाणी' ती आठवण कधीच विसरत नाही.

श्रावण महिन्यामध्ये आम्ही यवतेश्वर, कुर्णेश्वर, मंगळाई येथे जात असू. ती मजा काही औरच असे. क्षणात ऊन तर क्षणात पाऊस पडत असे. त्यावरून या ओळी आठवतात. (भा.रा.तांबे यांच्या ओळी)

पिवळे तांबूस ऊन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर
झाडांनी किती मुकुट घातले डोकीस सोनेरी
कुरणांवर शेतात पसरला गुलाल चौफेरी ॥

माझ्या भावाचे मित्र एका कुटुंबातील भाऊ भाऊ पिठाचे तोबरे भरून येत. त्यांचे वडील मागून आले की त्यांचे फस्स व्हायचे. वडील म्हणत काय विड्या ओढताय का रे ? XXX नो. असे प्रसंग आठवले की हसू येते.

कुठे गेले ते बालपण ? ते अंगणात दुडूदुडू धावणे, देव पूजेसाठी फुले गोळा करणे, शाळेत जाण्यासाठी अळमटळम करणे आणि गेल्यावर बाईंच्या छडीचा मार खाणे.

एकदा केव्हातरी शांतपणे बसावे आणि वयानुसार आपण काय काय गोष्टी सोडल्या ह्याचा आढावा घेतला की मग लक्षात येते की आपण गाभुळलेली चिंच अनेक वर्षात खाल्लेली नाही. जत्रेत मिळणारी पत्र्याची शिट्टी वाजवलेली नाही. चटक्याच्या बिया घासून चटके द्यावेत असे आता वाटत नाही. तसेच कापसाची म्हातारी पकडण्याचा चार्मही राहिलेला नाही.

'आठवणी दाटतात उरी, धूके जसे पसरावे.' असे म्हणावेसे वाटते.

~~~

# हवा निवारा; हवी भ्रमंती

कुठली माती कसली नाती
आप आपले गीऽत गाती
अगणीत असती हात हाती
काल प्रवाही निसटून जाती
रात्री दिवसा स्वप्ने बघती
इवली पाखरे इमले बांधती
नवीन घरटी नवे सोबती
चार दिसांनी उडून जाती
पुन्हा प्रत्यये ते आठवती
काही जीवलग सखे सोबती
कुणा आवडे कसा निवारा ?
स्वतः चाले हा प्रवासी सारा
कर्म भोग खेळता निवारा (निपटारा)
पुन्हा खेळण्या हवा निवारा

श्री. सुधाकर विनायक भिडे,
नाडण-देवगड (सिंधुदुर्ग)

सुरक्षित (शाश्वत) निवाऱ्यात राहून भ्रमंतीचा (मुक्तीचा) निखळ आनंद घेणे हेच मानवी जीवन जगण्याच कौशल्य (रहस्य) आहे.
~~~

## - शिष्यवृत्ती -

भिडे कुलातील गरजू व हुषार तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ''प्रदीप व शीला भिडे शैक्षणिक निधी'' मधून भिडे प्रतिष्ठानकडून शैक्षणिक आर्थिक मदत / शिष्यवृत्ती सुरू केलेली आहे. इच्छुकांनी आपले अर्ज नांव/पूर्ण पत्ता/संपर्क क्रमांक/शिक्षण अर्हता आणि पालकांचे उत्पन्नासह माहिती प्रतिष्ठानच्या पत्रव्यवहाराकरिता असलेल्या पत्त्यावर त्वरीत पाठवावे. सदरहू शिष्यवृत्ती विना परत फेडीची आहे.



# विद्यार्थी गुणगौरव, पुरस्कार आणि ज्येष्ठांचे सत्कार याबाबत निवेदन

## १० वी आणि १२ वी च्या यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

दि. १७ व १८ जानेवारी २०१५ रोजी होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात दरवर्षीप्रमाणे गुणगौरव/ज्येष्ठांचा सत्कार आणि पुरस्कार वितरण समारंभ संपन्न होणार आहे. खाली दिलेल्या गटातील निकषांनुसार माहिती दि. २० डिसेंबर २०१४ पर्यंत आयकार्ड फोटोसह खालील पत्त्यावर पाठवावी. डॉ. सौ. धनश्री श्रीनिवास भिडे (प्रमुख, विद्यार्थी गुणगौरव योजना) ३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०. फोन : ०२०-२४३३७४५५

- विशेष सूचना -

१) विद्यार्थी गुणगौरव योजनेचा फॉर्म याच अंकात दिलेला आहे. त्याची झेरॉक्स प्रत उपयोगात आणली तरी चालेल किंवा आपल्या वेबसाईटवरून तो फॉर्म डाऊनलोड करून घ्यावा. २) अपूर्ण माहितीचा विचार केला जाणार नाही. ३) एका पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची माहिती पाठवायची असल्यास या फॉर्मची झेरॉक्सप्रत उपयोगात आणावी. ४) पारितोषिकासाठी/पुरस्कारासाठी/सत्कारासाठी निवड झालेल्यांना पत्राने किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क करून कळविले जाईल. त्याकरिता आपला संपर्क क्रमांक तसेच आयकार्डसाईज फोटो देणे आवश्यक आहे. ५) पुरस्कारासाठी आपले नामांकन गटानुसार दिलेल्या निकषांप्रमाणे पाठवावे आणि त्या संबंधीच्या झेरॉक्सप्रती जोडव्यात. ६) ज्येष्ठांच्या सत्काराकरिता आपले नांव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, व्यवसाय/नोकरी, सामाजिक कार्य व उल्लेखनीय कामगिरी, पारितोषिके इत्यादी माहिती कोऱ्या कागदावर शक्य असल्यास आयकार्ड फोटोसह लिहून पाठवावी. ७) विद्यार्थी गुणगौरव योजनेच्या गटातील निकषांनुसार २०१३-२०१४ या वर्षातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी/विद्यार्थिनींनी माहिती पाठवावी.

गट पहिला - ४ थी व ७ वी च्या स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (स्कॉलरशिप परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

गट दुसरा - ५ वी ते ९ वी पर्यंतच्या वार्षिक परीक्षेत सर्व तुकड्यात प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र व गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक.

गट तिसरा - दहावीच्या शालांत परीक्षेत ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

गट चौथा - १० वी च्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक) (श्रीमती प्रियवंदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी, मुंबई कै. श्रीपाद सखाराम भिडे यांचे स्मरणार्थ)

गट पाचवा - १२ वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक) डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली (कै.के.वि. तथा दादूकाका भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

गट सहावा - १२ वी च्या परीक्षेत शास्त्र शाखेत ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे, कला शाखेत ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे आणि वाणिज्य शाखेत ७५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक)

गट सातवा - १० वी च्या शालांत परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्री. बळवंत दत्तात्रय भिडे, अमळनेर (कै. सिंधू विनायक भिडे, यांचे स्मरणार्थ) (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

गट आठवा - १० वी च्या शालांत परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्री. जनार्दन कृष्णाजी भिडे, विलेपार्ले, मुंबई पुरस्कृत. (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

गट नववा - १० वी च्या शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. (सौ. स्नेहा रमेश आपटे (भिडे) पुरस्कृत. त्यांचे वडील, (कै. दत्तात्रय विनायक भिडे अमळनेर यांचे स्मरणार्थ) (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.)

गट दहावा - संगीत, नृत्य, नाट्य, गायन, वक्तृत्व आणि क्रीडा अशा विषयात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनी. सदर प्राविण्य कुठल्या स्तरावर मिळविले आहे, याची माहिती व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

गट अकरावा - विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना : इरावती ट्रस्ट, दादर, मुंबई यांच्या प्रमुख सुमित्रा मधुसूदन भिडे यांनी कै. त्रिंबक राजेश्वर भिडे आणि कै. जानकीबाई त्रिंबक भिडे यांच्या स्मरणार्थ पुरस्कृत केलेली विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना खालीलप्रमाणे....

आर्थिक परिस्थितीमुळे अडचणीत असलेल्या कोणत्याही गुणवान, आभियांत्रिकी किंवा आर्किटेक्ट शाखेत शिक्षण घेत असलेल्या, भिडे कुलातील विद्यार्थी/विद्यार्थिनीला दरवर्षी सहाय्य देण्यासाठी पारितोषिक/मदतीची योजना आहे.

गट बारावा - श्री. प्रदीप वासुदेव भिडे व डॉ. शीला प्रदीप भिडे दिल्ली पुरस्कृत गरजू व गुणवत्ताप्राप्त शालेय अथवा महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी विनापरतफेड विशेष आर्थिक मदत आहे.

*७५ वर्षे किंवा त्यावरील सत्कारार्थी ज्येष्ठ कुलबंधु/भगिनी/माहेरवाशिणींनी फोटोसह माहिती पाठवावी.*

## विद्यार्थी गुणगौरव योजना फॉर्म

**अ**

पालक/वडील/आईचा
सभासद क्रमांक :

**(विद्यार्थ्याने संपूर्ण माहिती स्वत:च्या हस्ताक्षरात भरावी)**

१)संपूर्ण नाव ______

२)जन्म दिनांक ______ जन्म ठिकाण ______

३)आजपर्यंत झालेला अभ्यासक्रम ______

४)पुढे काय शिकणार व कोणत्या गावी ______

५)सध्या शिकत असलेल्या शिक्षण संस्थेचे संपूर्ण नाव व पत्ता ______

६)विद्यार्थ्याच्या वडिलांचे संपूर्ण नाव व नोकरी/व्यवसाय करीत असल्यास तेथील हुद्दा व पूर्ण पत्ता ______

______ दूरध्वनी/मोबा.

७)विद्यार्थ्याची आई नोकरी/व्यवसाय करीत असल्यास तेथील हुद्दा व पूर्ण पत्ता ______

______ दूरध्वनी/मोबा.

८)अ) विद्यार्थ्याच्या पालकांचे नाव व पूर्ण पत्ता ______

______ दूरध्वनी/मोबा.

ब) पालकाचे अर्जदार विद्यार्थ्याशी नाते ______

९)अ) पत्रव्यवहाराचा पत्ता ______

ब) कायम राहण्याचा घरचा पत्ता ______

१०)कुठल्या गटातील गुणगौरव योजनेसाठी आपण माहिती सादर करीत आहात ? ______

११)सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांचा तपशील ______

दिनांक : (विद्यार्थ्याची स्वाक्षरी)

**ब**

(वडिलांनी/पालकाने भरावयाची माहिती)

१) अर्जदाराच्या वडिलांचे आणि त्याच्या कुटुंबातील इतर सर्व व्यक्तींचे एकूण वार्षिक उत्पन्न : रुपये (अक्षरी)

२) विद्यार्थी गुणगौरव योजनेअंतर्गत आपल्या मुलाच्या/मुलींचा विचार करावयाचा असेल तर त्यासाठी आपण प्रतिष्ठानचे सदस्य असणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी. सदस्य नसलेले सदस्य होऊ शकतात. सदस्य होण्यासाठी भरावयाची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

- आश्रयदाता : रु. १०,०००/-
- हितचिंतक : रु. ५,०००/-
- आजीव : रु. १,०००/-

पालकाची स्वाक्षरी

नाव : ______

पूर्ण पत्ता : ______

दूरध्वनी क्रमांक/मोबाईल : ______

दिनांक : सभासद क्र. :

विशेष सूचना : १) माहिती सुवाच्य अक्षरात संपूर्ण भरून दि. २० डिसेंबर २०१४ पूर्वी पोहोचेल. अशा बेताने खालील पत्त्यावर पाठवावी.

**सौ. धनश्री श्रीनिवास भिडे (प्रमुख, विद्यार्थी गुणगौरव योजना)**

३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०. दूरध्वनी - ०२०-२४३३७४५५

## प्रतिष्ठानचे पुरस्कार - २०१५

**समस्त भिडे कुलबंधु/भगिनी आणि माहेरवाशिणींककरिता**

दरवर्षी भिडे प्रतिष्ठानकडून भिडे कुलसंमेलनात खालील पुरस्कार देण्यात येतात. त्याकरिता खाली दिलेल्या निकषानुसार आपले नामांकन, पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, कौटुंबिक माहिती आत्तापर्यंत मिळालेल्या पुरस्कारासंबंधी माहिती आणि त्याच्या सत्य प्रति (झेरॉक्स) व आपला आयकार्ड साईज फोटोसह डॉ. सौ. धनश्री श्रीनिवास भिडे, ३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०. दूरध्वनी - ०२०-२४३३७४५५ ह्या पत्त्यावर दि. २० डिसेंबर २०१४ पर्यंत पाठवावेत.

नामांकन देणारी व्यक्ती स्वतः किंवा त्याच्या नातेवाईकांनी वरील माहितीसह पाठविली तरी चालणार आहे.

**पुरस्काराचे स्वरूप :-** अनु. क्र १ करिता रोख रु. १५००/-, अनु.क्र. २, ३, ४ करिता रोख रु. १०००/- व अनु. क्र. ५ करिता रोख रु. १०,०००/- आणि शाल, श्रीफळ, सन्मानपत्र इ.

१) साहस किंवा क्रीडा पुरस्कार - भिडे कुटुंबातील साहसीवृत्तीचय किंवा क्रीडा क्षेत्रामध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या भिडे कुलोत्पन्न व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. (श्री.रा.म.भिडे, निगडी पुरस्कृत कै. श्रीकृष्ण भिडे (श्रीकृष्ण भिडे प्रतिष्ठान) ह्यांचे स्मरणार्थ

२) 'माझी आई' पुरस्कार - भिडे कुलोत्पन्नातील गृहिणी, जेष्ठ स्त्री असावी, तसेच अल्प उत्पन्न व प्रतिकूल परिस्थितील तोंड देऊन मुलांकरिता किंवा स्वतःच्या कुटुंबाकरिता विशेष कार्य करणारी (श्री. रविन्द्र रावजी भिडे, कल्याण पुरस्कृत त्यांच्या मातोश्री कै. सुशीला रावजी भिडे यांचे स्मरणार्थ)

३) 'आपली सून' पुरस्कार - सुसंस्काराचा वारसा सतत पुढे नेण्याचे कार्य करणारी किंवा विशेष प्राविण्य अथवा विशेष पारितोषिक मिळालेली किंवा समाज कार्यात अग्रेसर असणारी किंवा अध्यात्मिक क्षेत्रात प्रचारकार्य करणारी किंवा विशेष लेखन करणारी किंवा प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांसाठी, कुटुंबासाठी विशेष धडपड करणारी असावी. (सौ. मेधा उर्फ अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत)

४) 'कला' पुरस्कार - संगीत, नाटक, सिनेमा किंवा इतर कला क्षेत्रातील काम करणारी खास भिडे व्यक्ती असावी. (श्री. कुमार आणि वसंत विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत, यांचे बंधु कै. सुभाष विष्णू भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

५) उद्योजक पुरस्कार - लघुउद्योजक किंवा नव्याने व्यवसाय, उद्योग सुरू केलेला धडाडीने, कष्टाने, प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा नेटाने व्यवसाय वृद्धी करणाऱ्या तरुण भिडे व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. (श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत यांचे वडील कै. विष्णू विनायक तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

~~~

## पाळणा

गोकुळ अष्टमीच्या निमित्ताने केलेला हा पाळणा, भिडे कुलात नवीन येणाऱ्या चिमुकल्यांसाठी, माझ्या मैत्रिणींबरोबर शेअर करीत आहे.

नंदनंदना राजकुमारा
जोजविते तुज कमल लोचना

मंगलदिन हा मंगलसमयी
मंगल गाऊ मंगल गाणी
औक्षण करण्या उभ्या गोपिका
घेऊनी सुवर्ण ज्योती
नंदनंदना....

रत्नजडित हा झुले पाळणा
वरी शोभिती मौक्तिक माला
वात्सल्याने माय माऊली
जोजवी रे सुकुमारा
नंदनंदना....

मऊरेशमी कुंतल काळे
इवली जिवणी रुप साजिरे
कौतुक करण्या जमले सारे
गोकुळ, रे लडिवाळा
नंदनंदना....

नंदकिशोरा चित्त वेधते
नको वाजवू सुवर्णवाळे
बाललिला तुझ्या पाहण्या
येती चंद नी तारे
नंदनंदना....

सौ. प्रिया भिडे, पुणे
मो. : ९९२२१४६५५५

### संगमेश्वर - बस व रेल्वे सुविधा

दि. १७ व १८ जानेवारी २०१५ रोजी संगमेश्वर (रत्नागिरी) येथे भिडे कुल संमेलनाला पुणे आणि मुंबईहून जाण्यायेण्यासाठी ना नफा, ना तोटा ह्या तत्वावर अनुक्रमे बस व रेल्वेचे नियोजन करण्यात येत आहे. संपर्कासाठी -

श्री. माधव पु. भिडे, पुणे - ९७६३७२७६८८
श्री. देवेन्द्र भिडे, कल्याण - ०२५१-२३२७३९५
श्री. प्रदीप भिडे, डोंबिवली - ९८९२५०४०४२
सौ. संपदा भिडे, मुंबई - ९८१९९५१३९१
~~~

# नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

(ई - २०१४० (मुंबई), दिनांक १६ एप्रिल २००२)

रजि. ऑफिस - १, सुरेश विठ्ठल व्हिला, १२ वा रस्ता, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२. दूरध्वनी : ६०५२६६४/५. E-mail:office@bhidekul.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : १४२६, सदाशिव पेठ, निलसदन, पुणे - ३०. किंवा शिवानंद सोसायटी (बेसमेंट), सुळे पार्क, एम्. जी. रोड टाइम्स् ऑफ इंडिया शेजारी, नौपाडा ठाणे (प.) ४०० ६०२.

## सभासद अर्ज

'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान'चा मी सभासद होऊ इच्छितो.
प्रतिष्ठान तसेच कुलवृत्ताच्या संकलनाच्या कामात मी यथाशक्ती वेळ देऊ शकेन/शकणार नाही.
सभासद वर्ग : आश्रयदाता / हितचिंतक / आजीव

**अ) सभासद वर्ग :-**

१) आश्रयदाता : रु. १०,०००/- किंवा अधिक एकरकमी देणारे  २) हितचिंतक : रु. ५,०००/- किंवा अधिक एकरकमी देणारे
३) आजीव : रु. १,०००/- किंवा अधिक एकरकमी देणारे

**ब) सूचना : -**

१) चेक/ड्राफ्ट हे पुणे/मुंबई येथील बँकेवरील 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' या नावाने काढावा.
२) पुणे/मुंबई बाहेरील बँकेचा चेक पाठवताना रु. ५०/- जास्त पाठवावेत.
३) प्रत्येकाने स्वतंत्र अर्ज भरावा. जरूर पडल्यास झेरॉक्स करून वापरावा.

वर्गणी रु. [ ] रोख / डिमांड ड्राफ्टने / चेकने सोबत / मनीऑर्डरने वेगळी पाठवीत आहे.

संपूर्ण नांव ____________________

जन्मतारीख ____________________

संपूर्ण पत्ता ____________________

(जवळच्या खुणेसह) ____________________

दूरध्वनी क्रमांक [ ]  STD कोड [ ]

मोबाइल क्रमांक [ ]  E-mail : [ ]

व्यवसाय / नोकरी ____________________ हुद्दा ____________________

संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

दूरध्वनी क्रमांक : [ ]  E-mail : [ ]

तारीख  सही ____________________

---

### कार्यालयीन वापरासाठी

१) सभासद क्रमांक : [ ]  २) पावती क्रमांक : [ ]

तारीख  कार्याध्यक्ष  विश्वस्त

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

पुणे कार्यालय :
९२, शुक्रवार पेठ, रंजन को-ऑप. हौसिंग सोसायटी,
मंडई गणपतीजवळ, पुणे ४११००२.
फोन : दिलीप भिडे - मो. ९६५७५४१२३६

**● पत्रव्यवहारासाठी पत्ता ●**

ले.क. सुनिल वासुदेव भिडे
१४२६, सदाशिव पेठ, निलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.
मो. ९६२३०१७४४४



## सहवेदना

भिडे कुलातील ज्ञात व अज्ञात व्यक्तींचे निधन झाले

त्यांना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.

ईश्वर त्यांना चिरशांती देवो ही प्रार्थना !

## 'आम्ही भिडे' जाहिरात पत्रक

१) त्रैमासिक/वार्षिक पूर्ण पान साधे (B/W) ----- रु. २,०००/-
२) त्रैमासिक/वार्षिक अर्धे पान साधे (B/W) ----- रु.१,०००/-
३) त्रैमासिक/वार्षिक पाव पान साधे (B/W) ------- रु.५००/-
४) त्रैमासिक/वार्षिक शुभेच्छा पट्टी (B/W) ------- रु.५००/-
५) वार्षिक अंक प्रायोजकत्व --------------- रु. ३५,०००/-
६) त्रैमासिक अंक प्रायोजकत्व --------------- रु. ८,०००/-

प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले. मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल डवीर
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
RNI No. M-6 (1457)/70-RNI

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२७


# BHIDE & SONS PVT. LTD.

Bhide

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : **5 to 10 H.P.**
Output Capacity : **500 Kg / hr.**
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : **15 to 20 H.P.**
Output Capacity : **1 Tonn / hr.**
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : **25 to 30 H.P.**
Output Capacity : **3 Tonn / hr.**
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : 2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.
Output Capacity : 200 Kg / hr., 400 Kg / hr., 600 Kg / hr.
Motor driven & Engine Driven Model also available

## INDUSTRIAL PRODUCTS

**PISTON VALVES**
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**




**Pressure - From 30 kg/cm² to 300 kg/cm²**
**Application - Chemical Injection, Cleaning**
**Drainage Pipes, Boiler feed etc.**

**CASTINGS**



**Heavy C.I. Castings**
**Maximum single piece -**
**2 Tonn**

**S.G.IRON FOR**
**AUTO COMPONENTS**



**Castings :**
**Steel, Stainless Steel & S.G. Iron**
**Range - From 1 kg. To 100 kg.**

**LADDLE**



**Foundry Crane Laddles**
**Capacity : Upto 20 Ton**